# प्रकरण ६ वे

## बार्शी बाजार आवारातील शेतमालाची उलाढाल

६.१ बार्शी तालुक्यातील पीक प्रवृत्ती

६.२ शेतमालाची आवक

६.३ बाजार आवारातील शेतमालाची एकूण किंमत

६.४ शेतमालाची सरासरी किंमत

६.५ शेतमालाचे प्रमाणीकरण

६.६ श्रेणीकरणाचे प्रमाण

६·१ बार्शी तालुक्यातील पीक प्रवृत्ती :

बार्शी तालुक्याचे भौगोलिक स्थान, हवामान व पर्जन्यमान लक्षात घेतल्यास हा तालुका नेहमीप्रमाणे अवर्षणाने ग्रासलेला तालुका आहे हे स्पष्ट आहे· पीक प्रवृत्तीवर पाऊसमानाचा परिणाम होतो· एखाद्या वर्षी ब-या-पैकी पाऊस झाला तर शेतक-यांच्या पीक प्रवृत्तीवर परिणाम होतो· यानंतर महत्वाचा घटक म्हणजे शेतमालाच्या किंमती· ज्या प्रमाणे शेती हा व्यवसाय मान्सून बरोबरचा जुगार समजला जातो, त्याच प्रमाणे शेतमालाची विक्री ही सुध्दा किंमती बरोबरचे जुगारच आहे· अशा अनेक परिणामातून व्यक्त होणारी, बार्शी तालुक्यातील पीक प्रवृत्ती , जमीनीचा वापर इत्यादी सारणी क्रमांक६·१ मध्ये दर्शविली आहे·

बार्शी तालुक्यात प्रामुख्याने ज्वारी, गहू, कडधान्ये व तेलबियांचे पीक घेतले जाते· त्यानंतर रोख पैसे मिळवून देणारी जिरायती पीके उदा· धने, कापूस, डाळीची पीके घेतली जातात· रोख पैसे मिळवून देणारी बागायती पीके म्हणून हळद, मिरची, उस, इत्यादी पीके घेतली जातात·

सन १९५९-६0 साली रब्बी ज्वारीची लागवड १,४६,0६३ हेक्टरमध्ये केली होती, तर १९६१-६२ मध्ये ८९,९३0 हेक्टर जमीन रब्बी ज्वारीच्या लागवडीखाली आणली होती· म्हणजे १९५९-६0 च्या तुलनेने १९६१-६२ मध्ये रब्बी ज्वारीच्या पिकाखालील क्षेत्र ५६,१३३ हेक्टरनी कमी झाले· १९६१-६२ नंतर रब्बी ज्वारीखालचे क्षेत्र सातत्याने कमी होत गेल्याचे दिसते· याचे प्रमुख कारण म्हणजे संकरीत बी-बियाणांचा शोध होय· खरीप हंगामात पेरता येणारी आणि कमी पाऊसावर खात्रीने आणि जास्त उत्पादन देणा-या संकरीत ज्वारीची वाण शोधून काढली होती· त्यानंतर, म्हणजे १९६५-६६ साली ९0,१५८ हेक्टर जमीन रब्बी ज्वारीच्या लागवडीखाली व १६८७ हेक्टर जमीन

सारणी क्रमांक ६·१

बार्शी तालुक्यातील पीक प्रवृत्ती

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

पा·नं·१

| | १९५९-६० | १९६०-६१ | १९६१-६२ | १९६२-६३ | १९६३-६४ | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ | १९६७-६८ | १९६८-६९ | १९६९-७० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी (रब्बी) | १,४६,०६३ | १,०६,१२९ | ८९,९३० | ९१,५३४ | ८,८५० | ८,७१५ | ९०,१५८ | ८९,३७८ | ७४,५७१ | ५५,०९७ | ६५,९६८ |
| ज्वारी (खरीप) | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | २,०१३ | ४९१ | ४६० | १,६८७ | १,७७८ | १,६१५ | १,५१० | १,६२४ |
| गहू | ७,९०३ | २,४३३ | ३,३२४ | १,३५० | ५२ | १,७२३ | १,६८७ | १,८२१ | १,९८४ | २,१२१ | २,१७० |
| जोड | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | १,१८५ | ८०६ | ८१० | ६५१ | ८३० | १,०८६ | १,०८६ | १,०३६ |
| साळी | उ·ना· | ५१८ | १,६३७ | उ·ना· | १,९३९ | १,८५७ | २,२०१ | १,२८० | १,६८७ | १,७६८ | १,५०९ |
| बाजरी | ५,९१८ | ५७६ | ८८६ | ८६० | १,४९० | १,४२९ | १,३१६ | १,४५३ | २४८ | १,६८८ | २,२१४ |
| वरी (राळे) | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | १०२ | १२३ | ९७ |
| मका | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | १४८ | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ४१५ | ४३२ | ५३२ |
| सावा व इतर | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | १८ | १३२ | २४४ |
| हुलगा | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ४१६ | २,४६९ | ३,२२७ |
| हरभरा | ८,२३३ | उ·ना· | २,८४२ | २,७०९ | २,१८० | २,३०७ | २,०८२ | २,१४८ | १९ | ३,०२६ | २,९३९ |
| तूर | २९,५९६ | १,१९८ | १२,६१९ | ८,२४९ | २१,१८७ | १२,६११ | १३,७७३ | १५,८०२ | १८,५४१ | २१,३१५ | २२,७१५ |
| मूग | ८,८६९ | ३,५२५ | ४,३०६ | २,००४ | ३,५३४ | ३,६४२ | २,४४९ | १,८५५ | १,६७९ | १,४०२ | १,८१७ |
| उडीद | १,८७७ | २४५ | ६६७ | ६३९ | ६३० | ६४५ | ७२२ | ६९० | ८२१ | १,०४२ | १,१५८ |
| मटकी | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ३७७ | ४४३ | ५६० |
| मिरची | १,४३३ | -१,०४८ | ४७० | ३९२ | ४५० | ४८२ | ३५६ | ३३७ | ३५७ | ३१४ | ६६३ |
| चिंच | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| धने | १४० | ३७ | ३४ | ३२ | १७ | ३७ | २३ | ३० | २९ | २३ | १९ |
| हळद | १८० | १७१ | २२६ | २५६ | २७६ | १५० | २२३ | २७५ | २४६ | ३२४ | ३११ |
| ऊस | ३१३ | ४७२ | ५३७ | उ·ना· | ३४९ | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | २८० | ७३ | ७०७ |
| कापूस | २९६ | १३४ | १७७ | ११९ | ८८ | ८५ | ४४ | ३९ | उ·ना· | ०६ | ०६ |
| भगर | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | २४८ | १३४ | उ·ना· |
| भादली | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | २१८ | १११ | १९४ |
| कांदा | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | २०३ |
| बटाटा | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| सातू | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ३९ |
| द्राक्ष | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| एकूण .. | २१,०८२ | १,१६,४५६ | १,१६,३५५ | १,११,३३२ | ४२,४८७ | ३४,२५३ | १,१७,३८२ | १,१०,७१६ | १,०४,७५८ | ९४,६३९ | १,०९,९५२ |

उ·ना· : उपलब्ध नाही·

···· पुढे चालू ···

सारणी क्रमांक ६.१ पुढे चालू ....

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

पान नं.२

| | १९७०-७१ | १९७१-७२ | १९७२-७३ | १९७३-७४ | १९७४-७५ | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८१-८२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी (रब्बी) | ६४,६०६ | ८१,९८६ | ११,९०८ | ६७,८१० | ५९,७४२ | ४३,१०८ | ८२,४०३ | ६८,७९६ | ७६,६४६ | ९१,९५४ | ९७,२६९ |
| ज्वारी (खरीप) | उ.ना. | २६६ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १,५१३ | ३,१४७ | २,४८० | २,९५६ |
| नेके गहू | ३,५१० | ४,४०५ | २५० | ३,१८२ | ९,२६० | ३,८८२ | १,७२४ | २,६३५ | २,५५६ | २,१८३ | २,५४,७९३ |
| जोड | उ.ना. | १,१७२ | २२ | ८८७ | १,२५९ | ९९३ | १,७८५ | ४१८ | ७०७ | ४०३ | २९४ |
| साळी | १,५७९ | ५९० | १०२ | १,५६२ | २,३५० | १,३८५ | १,७२४ | १,९१८ | १,५९३ | १,१४६ | १,१४५ |
| बाजरी | २,५५१ | १,१२३ | १,२६० | ३,२७६ | ४,५१२ | १,१२२ | ८०२ | १,१४५ | ७७१ | ६०३ | ६३५ |
| वरी (राळे | ३७४ | १०९ | उ.ना. | १५ | १ | उ.ना. | १,११९ | ११ | ४ | २०० | ११९ |
| मका | ६६२ | ५७१ | ५६ | १,५०९ | २,१४१ | १,१८० | ३८२ | १,९९८ | १,१५८ | ६४३ | ५७० |
| सावा व इतर | २२५ | ९१ | उ.ना. | १,२९५ | ४,३१३ | ९७३ | ३० | उ.ना. | उ.ना. | ३३ | उ.ना. |
| हुलगा | २,५८७ | ४३५ | ४० | ४,४३२ | ४,४८७ | ६,२९३ | ५२६ | ८३४ | ३,७४० | ३,०५१ | २,८५५ |
| हरभरा | ३,२७७ | ५९,४०९ | ३०६ | ३,३०७ | १४,९०६ | ४,९४४ | २,६१४ | २,४८७ | २,५८० | २,३४६ | ३,१३८ |
| तूर | २५,५५३ | ७,९७८ | ८०४ | १६,७३३ | २६,४३० | ३३,१९६ | १४,५७२ | २०,५०६ | २१,२९० | १९,७४९ | १९,७४५ |
| मूग | १,६०० | ५२१ | १ | १,२०८ | १,४२७ | ६९० | उ.ना. | ८२२ | ८२९ | ८१९ | ८३८ |
| उडीद | १,०७० | ४६३ | १८ | ७८६ | १,३०१ | ४२९ | १,४८४ | २८० | ३७३ | ३३६ | ४३१ |
| मटकी | ६७६ | १,७६४ | उ.ना. | उ.ना. | १७६ | २८९ | उ.ना. | ३७२ | ८१६ | ४५९ | ३८४ |
| मिरची | ३९४ | ४५५ | उ.ना. | २२३ | २५१ | २५५ | २११ | ६६ | १७३ | उ.ना. | २३० |
| चिंच | १८ | उ.ना. | उ.ना. | उ. ना. | २५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| धने | ४०३ | ३७९ | उ.ना. | २५२ | उ.ना. | ४३ | १५५ | ११५ | ३०६ | [illegible] | ११७ |
| हळद | १३ | ००७ | ९० | १७२ | १७५ | उ.ना. | उ.ना. | २२९ | २३३ | ३९८ | ५४२ |
| ऊस | ६६४ | ३८२ | १७० | ३९० | २४६ | १,००६ | ७१४ | १,३०८ | १,१३३ | ६६१ | ९८१ |
| कापूस | ३९ | २१ | उ.ना. | ३६ | १५ | १,३८७ | ४१ | १९ | १७ | ५६ | उ.ना. |
| भगर | उ.ना. | ३ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २७० | २०७ | २१८ | उ. ना. |
| भादली | २४९ | ११ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १६५ | ४०९ | ८९ | १९१ | २०२ |
| कांदा | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २७५ | १७६ | ४३ | ९९ | २८५ | ३६२ | ४६४ | उ.ना. |
| बटाटा | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ३८ | २ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| सातू | उ.ना. | ५७१ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २१ | ८२ | २४ | १७८ |
| द्राक्ष | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| लसूण | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १५ | १,३४९ | ०९ | १३ | २० | ३१ | ५४ |
| एकूण : | १,१०,०३० | १,६२,९३० | २,८१९ | १,०७,३११ | १,३३,२०८ | १,०२,४८५ | १,१०,५६२ | १,०६,४६८ | १,१८,८३२ | १,२८,५५९ | ३,९२,८३९ |

उ.ना. : उपलब्ध नाही.

आधार : वार्षिक अहवाल कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी १९५९-६० ते १९८६-८७.

.... पुढे चालू ....

सारणी क्रमांक ६·१ पुढे चालू ···· (क्षेत्र हेक्टर मध्ये)

पान नं·३

| | १९६२-६३ | १९६३-६४ | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ |
|---|---|---|---|---|---|
| ज्वारी(रब्बी) | ७८,३८८ | ७७,३२४ | ७७,७९५ | ७१,०४८ | ७५,००७ |
| ज्वारी(खरीप) | १७० | ५१३ | १,८३२ | १,२६९ | ४५९ |
| गहू | १,५७२ | २,००६ | १,५६९ | १,२४७ | ७१९ |
| जोड | ३२५ | ३०० | ४२५ | १४९ | ८४ |
| साळी | ७७२ | ७३० | ६४६ | ५०६ | २८९ |
| बाजरी | ५३१ | ४४६ | ३५२ | २४३ | ३५७ |
| वरी | १३४ | ६९२ | २३४ | ४४ | ४१ |
| मका | ५६१ | ५९१ | ६२८ | ५५२ | ३०५ |
| सावा व इतर | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| हुलगर | २,०२४ | २,८३४ | १,६५७ | १,५०५ | ५९८ |
| हरभरा | २,११४ | २,१४९ | २,१४९ | १,७९५ | ७७१ |
| तूर | १७,०४८ | १३,८६६ | १५,४८३ | १५,०५७ | ८,१४३ |
| मूग | ३८१ | २८४ | २४३ | २९० | ४८६ |
| उडीद | १५९ | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| मटकी | ३५५ | ४५५ | ६४५ | २८१ | उ·ना· |
| मिरची | १९१ | १९६ | २०८ | २६१ | ३०७ |
| चिंच | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| धने | १४५ | ९२ | ४४ | ६१ | १८ |
| हळद | ४०० | २९२ | ३७३ | ३८९ | १०५ |
| उस | १,६०३ | ९८७ | ७९६ | उ·ना· | उ·ना· |
| कापूस | १८ | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| भगर | उ·ना· | १०२ | ६५ | ३५ | उ·ना· |
| भादली | १३० | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| कांदा | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | २७५ |
| बटाटा | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| सातू | ४० | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| द्राक्ष | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ११३ |
| लसूण | २१ | २५ | १५ | ९ | ०७ |
| एकूण ·· | १,०७,१६२ | १,०३,८८४ | १,०५,१८९ | ९४,७४१ | ८८,०८४ |

उ·ना· : उपलब्ध नाही·

खरीप ज्वारीच्या लागवडीखाली होती. रब्बी व खरीप मिळून १९६५-६६ साली ज्वारीच्या लागवडी खालील जमीन ९१,८४५ हेक्टर होती. १९७०-७१ साली ६४,६०६ हेक्टर जमीनीत रब्बी ज्वारीची लागवड केली होती. १९७१-७२ साली रब्बी ज्वारीच्या पिकाखालील क्षेत्र वाढले. परंतु खरीप ज्वारीखालील क्षेत्र फारच कमी, म्हणजे फक्त २६६ हेक्टर होते. कारण त्यावर्षी खरीप पेरणीला पाऊसमान खूप कमी होता. मृग नक्षत्रानंतरच्या पाउसाचे प्रमाण अगदीच कमी झाले. रब्बी पेरणीच्या वेळी मात्र मोठया प्रमाणात पाऊस झाला. खरीप पेरणीला ब-यापैकी पाऊस न झाल्यामुळे संपूर्ण खरीप हंगामातील पीकांवर त्याचा परिणाम झालेला दिसतो. १९७२-७३ हे दुष्काळी वर्ष होते. तरीसुध्दा अगदी क्वचीत ठिकाणी पेरणी झालेली होती. दरम्यानच्या काळात ज्वारीच्या पीकांप्रमाणेच इतर पिकांच्या प्रवृत्तीवर अनिष्ठ परिणाम झाला. १९७२-७३ नंतर पीक प्रवृत्तीत आमुलाग्र असा बदल झाला. पाऊसमानाचा अनिश्चितपणा, त्यात वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची वाढणारी मागणी यामुळे जवळ जवळ पारंपारीक देशी पीके घेण्याचे प्रमाण बंद होऊन संकरीत बी-बियाणे वापरण्याचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले. याशिवाय औषधे व रासायनिक खतांचा वापरही वाढला. १९७९-८० साली ९१,९५४ हेक्टर जमीनीत रब्बी ज्वारीची लागवड होती, आणि २४८० हेक्टर क्षेत्रावर खरीप ज्वारीची लागवड होती. एकूण रब्बी ज्वारीत खरीप ज्वारीचे प्रमाण २.६९% होते. अभ्यास कालखंडात हे प्रमाण जवळ जवळ कायम आहे. १९८५-८६ साली रब्बी ज्वारीच्या लागवडी-खाली ७१,०४८ हेक्टर क्षेत्र होते आणि खरीप ज्वारीचे क्षेत्र १२६९ हेक्टर होते. म्हणजे रब्बी ज्वारीच्या पिकाखालील क्षेत्र , खरीप ज्वारीक्षेत्रापेक्षा ६९,७७९ हेक्टरनी अधिक होते. एकूण खरीप ज्वारीचा हिस्सा १.७८% होता. १९५९-६० सालापासून रब्बी ज्वारीच्या लागवडीखालील क्षेत्र कमी कमी होत गेलेले दिसते. कारण खरीप हंगामात ज्वारीचे स्वतंत्र पीक अगदी थोडया प्रमाणात घेतले जाते, आणि जास्तीतजास्त तूर, सुर्यफूल, या पीका बरोबर मिश्र पीक म्हणून खरीप ज्वारीची लागवड केली जाते.

रब्बी ज्वारीला शाळू असे म्हणतात. बार्शी तालुक्यात रब्बी ज्वारीचे एक पीक घेतले जाते. रब्बी ज्वारीची पेरणी साधारणत: ऑक्टोबर महिन्यामध्ये होते. तोपर्यंत त्या भू क्षेत्रामध्ये कोणतेही पीक घेतले जात नाही. जून, जुलै ते ऑक्टोबर महिन्यापर्यंत सतत कुळवणी (मशागत पध्दत) करुन, त्या जमिनीची पूर्व मशागत केली जाते. ऑक्टोबरमध्ये पेरणी करुन, त्यामध्ये करडई हे अंतर्गत पीक घेतले जाते. खरीप ज्वारीची लागवड जून महिन्यात केली जाते. खरीप हंगामातील ज्वारी, संकरीत (हायब्रिड) असू शकते. पूर्वी खरीप कारज्वारीची लागवड घेतली जायची. ऑक्टोबर- नोव्हेंबर मध्ये संकरीत ज्वारीचे पीक काढल्यानंतर पाऊसमान अनुकूल असल्यास त्या जमीनीवर प्रामुख्याने गहू व हरभ-याची लागवड केली जाते.

खरीप हंगामातील लागवडीखालील पीके काढल्यानंतर काळ्या कसदार जिरायत जमिनीवर हंगामी किंवा कायम स्वरुपी जलसिंचनाच्या सोयी असणा-या जमिनीवर रब्बी हंगामात गव्हाचे पीक घेतले जाते. गव्हाच्या जोडीला त्याचाच एक दुसरा प्रकार, जोड (खपली) चे पीक घेतले जाते. परंतु हरितक्रांती घडवून आणण्यासाठी जास्तीत जास्त उत्पादन देणा-या गव्हाची बी-बियाणे निर्माण केल्यामुळे देशी बियांच्या गहू व जोडाची (खपली) पेरणी कमी झाली आहे. सन १९५९-६० मध्ये गव्हाच्या लागवडीखाली ७,९०१ हेक्टर क्षेत्र होते. परंतु त्यानंतर मात्र निव्वळ लागवडीखालील क्षेत्र कमी होते. गेले शेतक-यांनी जोडाचे पीक घ्यायला सुरुवात केली. १९६२-६३ साली गव्हाच्या पीकाखाली १३५० हेक्टर क्षेत्र व जोड पीकाखाली ११८५ हेक्टर क्षेत्र असे एकूण २५३५ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होती. १९६५-६६ साली लागवडीखालील क्षेत्र वाढले. १९७१-७२ साली गहू या पीकांखालील क्षेत्र ४४०५ हेक्टर होते. पण १९७२-७३ ला दुष्काळ पडल्यामुळे लागवडीखालील क्षेत्र एकदम कमी झाले. म्हणजे त्यावर्षी फक्त २५० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते. गहू या पिकाखालील जास्तीत जास्त क्षेत्र सन १९८१-८२ मध्ये, २,५४,७९१ हेक्टर इतके होते. आणि जोड या पिकाखाली फक्त २९४ हेक्टर क्षेत्र होते.

बार्शी तालुक्यात ज्वारी व गहू या प्रमुख पीकानंतर साळी, बाजरी, मका, यासारख्या तृणधान्याचा क्रमांक लागतो. दररोजच्या आहारात प्रमुख अन्नधान्य म्हणून ज्वारीनंतर बाजरीला प्राधान्य दिले जाते. बाजरी या पिकाखाली सर्वात जास्त लागवडीचे क्षेत्रफळ १९५९-६० साली, ५,९१८ हेक्टर इतके होते. आणि सर्वात कमी क्षेत्र १९८५-८६ साली, फक्त २४३ हेक्टर इतके होते. १९७२-७३ च्या दुष्काळी स्थितीपेक्षाही १९८५-८६ साली बाजारीचे क्षेत्र कमी होते. अलीकडे बाजरीचे क्षेत्र बरेच कमी होत गेल्याचे दिसते. कारण,

१) खरीप हंगामात बाजरीबरोबर घेतल्या जाणाऱ्या संकरीत ज्वारीचे उत्पादन, तुलनेने जास्त निघते,

२) बाजरी या पीकापेक्षा संकरीत ज्वारीची जमीन रब्बी हंगामासाठी लवकर उपलब्ध होते,

३) नवीन संकरीत बी-बियांच्यामुळे आणि विशेषत: रासायनिक खतामुळे गव्हाचे उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांचा अधिक ओढ असतो.

४) रासायनिक खत आणि जलसिंचनाच्या सोयीमुळे संकरीत ज्वारीच्या जमिनीवर गव्हाचे पीक चांगले निघते,

५) लोकांच्या आहार प्रवृत्तीत बदल झाला आहे,

६) बाजरीपेक्षा संकरीत ज्वारीला चांगला भावही मिळतो.

बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आहारात अगदी क्वचित प्रसंगी आढळणारे अन्नधान्य म्हणजे साळी (भाताचा प्रकार) होय. इ.स.१९७४-७५ मध्ये या पिकाखाली सर्वात जास्त म्हणजे २३५० हेक्टर क्षेत्र होते. आणि सन १९७२-७३ साली सर्वात कमी म्हणजे फक्त १०२ हेक्टर क्षेत्र होते. पावसाचे प्रमाण कमी व अवेळी असल्यामुळे हे पीक कमी प्रमाणात लागवडीखाली येते. उच्च पैदास बी-बियाणांच्या अगदी अल्प प्रमाणात वापर केला जातो, कारण बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी साळी या पिकाकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे.

१९७४-७५ साली, मका या पिकाखाली २१४१ हेक्टर क्षेत्र होते. विश्लेषण काळातील हे सर्वात जास्त क्षेत्र आहे. आणि १९७२-७३ साली सर्वात कमी फक्त ५६ हेक्टर इतके क्षेत्र मक्याखाली होते. १९७२-७३ च्या दुष्काळवर्षापर्यंत मका हे हळद या पिकातील अंतर्गत पीक होते. दुष्काळानंतर मका या पिकाखालील क्षेत्र मात्र वाढत गेले. कारण उच्च पैदास, बी-बियाणांच्या वापरामुळे उत्पादनअधिक होऊ लागले आणि त्याप्रमाणात मागणीही वाढत गेली. मक्याच्या वैरणीमध्ये साखरेचे प्रमाण अधिक असल्यामुळे संकरीत गाईसाठी एक प्रमुख खुराक म्हणून मक्याचा मोठया प्रमाणात वापर होऊ लागला आहे.

हरभरा, तूर, उडीद, मूग, मटकी इत्यादी कडधान्ये किंवा डाळीच्या पीकांच्या उत्पादनासाठी बार्शी तालुक्यातील शेतकरी जास्त लक्ष केंद्रीत करतात. एवढेच नव्हे तर अल्पभूधारक, मध्यम आणि मोठे शेतकरीदेखील खरीप हंगामातील रोख पैसे मिळवून देणारी व्यापारी पीके म्हणून वरील कडधान्यांची लागवड केली जाते. म्हणूनच बार्शी शहरात डाळ कारखान्याचे केंद्रीकरण झाले आहे.

हरभरा, हे रब्बी हंगामातील स्वतंत्र आणि मिश्र पीक म्हणून घेतले जाते. १९७१-७२ साली हरभरा पीकाखाली सर्वात जास्त क्षेत्र ५९,४०९ हेक्टर इतके होते. आणि सर्वात कमी १९६७-६८ व १९७२-७३ साली अनुक्रमे फक्त १९ व ३०६ हेक्टर इतके क्षेत्र होते. १९७१-७२ साली हरभरा या पिकाखालील क्षेत्र वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे, कमी पाऊसामुळे खरीप हंगामातील बरीच पीके करपून गेली होती. रब्बी ज्वारीसाठी राखून ठेवलेल्या जमीनीवर नेहमीप्रमाणे ज्वारी पेरली व बाकीच्या खरीप हंगामासह हलक्या भारी जमीनीवर घाईघाईत हरभ-याचे पीक घेतले गेले. एवढेच नव्हे तर ज्वारी, गहू ही पीके सोडून हरभरा पीकाशिवाय दुसरे पर्यायी पीक घेता येत नव्हते.

१९७५-७६ साली तूर पीकाच्या लागवडीखाली सर्वात जास्त, ३३,१९६ हेक्टर क्षेत्र होते आणि कमीत कमी १९६०-६१ व १९७२-७३ साली

अनुक्रमे ११६८ व ८०४ हेक्टर क्षेत्र होते.

मूग व उडीद या पीकांच्या लागवडीखाली अनेक ए चढ उतार आढळतात, कारण म्हणजे बाजारातील भाव कमी जास्त होण्याची प्रवृत्ती आणि पाऊसाचा अवेळीपणा होय. मूग लागवडीखाली सर्वात जास्ती क्षेत्र १९६०-६१ साली ३५२५ हेक्टर इतके होते.आणि सर्वात कमी १९८४-८५ साली फक्त २४३ हेक्टर इतके होते. आणि १९७२ च्या दुष्काळी वर्षात अगदी दुर्लक्षणीय म्हणजे फक्त एक हेक्टर क्षेत्र होते.

उडीद पीकाखाली जास्तीत जास्त क्षेत्र १९५९-६० व १९७६-७७ साली अनुक्रमे १८७७ व १४८४ हेक्टर इतके होते.

बार्शी तालुक्यातील शेतक-यांना रोख पैसा मिळवून देणारे नगदी पीक म्हणजे हळद आणि हळदीच्या पिकासाठी अनुकूल अशी जमिन बार्शी तालुक्यात पुरेशी आहे. हळदीचे सर्वात जास्त क्षेत्र १९८१-८२ साली, ५४२ हेक्टर इतके होते आणि सर्वात कमी क्षेत्र १९७१-७२ व १९७०-७१ साली होते.

हळदी बरोबरच उसाची लागवडही नगदीपीक म्हणून घेतली जाते. १९७५-७६ सालापासून ऊस लागवडीखालील क्षेत्रामध्ये सातत्याने वाढ होत गेल्याचे दिसते. १९७५-७६साली ऊस लागवडीखालील क्षेत्र १००६ हेक्टर इतके होते आणि १९८२-८३ साली ते क्षेत्र १६०३ हेक्टर पर्यंत वाढले.

कापसाचे पीक हे बार्शी तालुक्यातील फार जुने पीक आहे. खरे तर या पीकानेच बार्शी तालुक्याच्या विकासाला सुरुवात झाली. कापसाच्या उत्पादनाचे महत्व लक्षात घेऊनच बार्शी शहरात सूत गिरण्या व हातमाग वगैरे निघाले. इतकेच नव्हे तर बार्शी बाजार समिती स्थापन झाल्यानंतर शेतमालाचे नियमन करण्यासाठी चार शेतमालाचा परवाना मिळाला होता. त्या चारमध्ये कापूस व कापसापासून बाजूला होणारी रुई यांचा समावेश होता. यावरुनच बार्शी तालुक्यातील कापूस उत्पादनाचे महत्व लक्षात येते. पण अलिकडे कापसाचे

उत्पादन अगदी क्वचित ठिकाणी नावापुरते घेतले जाते. १९७५-७६ मध्ये कापूस लागवडीखाली जास्तीत जास्त क्षेत्र १२८७ हेक्टर इतके होते आणि कमीत कमी १९६८-६९ मध्ये फक्त ६ हेक्टर क्षेत्र होते.

भगर व भादलीचे उत्पादन अगदी कमी प्रमाणात घेतले जाते. कांदा, लसूण, बटाटा या पीकांच्या लागवडी वाढलेल्या आहेत.

नैसर्गिक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून रोख पैशाच्या अपेक्षेसाठी सदन शेतकरी प्रायोगिक स्वरूपात द्राक्षाचे पीक घेऊ लागले आहेत. १९८६-८७ साली द्राक्ष लागवडीखाली ११३ हेक्टर क्षेत्र होते. द्राक्ष पीकासाठी लागणारी अनुकूल जमिन आणि पाणी पुरेसे उपलब्ध व आहे. बागायती व्यापारी पीकाला सर्वात कमी पाणी लागणारे पीक म्हणजे द्राक्ष पीक असल्यामुळे भविष्यकाळात द्राक्ष लागवडीचे क्षेत्र निश्चित वाढेल असे वाटते.

सारणी क्रमांक ६.१ मध्ये तेल/बियाचे पीकक्षेत्र वगळलेले आहे. त्या संबंधीचे विश्लेषण प्रकरण क्रमांक ७ मध्ये केलेले आहे.

## ६.२ शेतमालाची आवक :

बार्शी कृषी उत्पन्न बाजार आवारामध्ये येणा-या नियमित शेतमालाच्या ( तेलबिया वगळून ) आवक प्रवृत्तीमधील बदल सारणी क्रमांक ६.२ मध्ये दर्शविलेला आहे.

बार्शी बाजारात ज्वारी, गहू, हरभरा, तूर, मूग, उडीद इत्यादी शेतमालाची आवक मोठयाप्रमाणावर होते. चिंचोका, कापूस, कांदा, लसूण व बटाटा यांची आवक कमी प्रमाणात होते.

एकूण शेतमालामध्ये ज्वारीची आवक सर्वात जास्त आहे. दिनांक २७.५.१९५५ पासून ज्वारी नियमित करण्याची मान्यता मिळाली. १९६१-६२ ते १९८६-८७ या काळातील सर्वात अधिक आवक इ.स.१९६३-६४ साली

सारणी क्रमांक ६·२

बार्शी कृषी उत्पन्न बाजार आवारातील शेतमालाची आवक

(क्विंटल मध्ये)

| | १९५९-६० | १९६०-६१ | १९६१-६२ | १९६२-६३ | १९६३-६४ | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ | १९६७-६८ | १९६८-६९ | १९६९-७० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी (रब्बी) | १,७१,६६२ | २४,८६,२८६ | २,६५,३६२ | १,७९,१०२ | ९,६९,७७६ | २,८९० | ६४,६३२ | ८६,९८६ | ६६,५४६ | आवकनाही | आ·ना· |
| ज्वारी(खरीप ) | उ·ना· | उ·ना· | उ·नाT· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| गहू | २१,६९७ | १७,०५३ | १२,७३५ | ५,१७६ | ६,९४२ | ९,९१७ | ५,६२८ | ५,५२३ | ४,०५७ | ४,३८२ | ५,८३७ |
| जोंड | १३,५३२ | ८८० | ५,६५८ | २,५५९ | ९८९ | २,८७४ | ३,४८६ | ५,४९९ | ४,५९१ | ५,९०३ | ४,७२१ |
| साळी | -- | १३,३१२ | ७,०७४ | ४,५४५ | १०,५५८ | २,७१३ | ६४ | -- | ३१२ | -- | --- |
| बाजरी | २,३६० | १,६०४ | २,३८४ | ६६६ | ९२८ | १,४४१ | ४,७१४ | ६,१३६ | ७,०९६ | ६,३३७ | २,९०० |
| बरई | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उननT· | उ·ना· | उ·ना· | १,५२५ |
| मक्का | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ३,१८२ |
| सावा व इतर | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | २४१ |
| हुलगा | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | १,४१८ |
| हरभरा | ९,६१५ | १५,०४२ | ८,५७५ | ४,५३७ | ४,३३८ | ३,७३१ | ४,९५९ | १०,६१५ | ५,७९४ | ९,०१२ | ६,६१९ |
| तूर | ९३,६२६ | ८०,२८८ | १,३०,१८५ | ७८,२४९ | १,०४,८९१ | ४६,८४७ | ३,१५,१६० | २८,७९३ | ५७,५५१ | ७४,७८७ | ४८,१२० |
| मूग | ४८,३४४ | ५२,१८९ | ११,००,१९५ | ५६,२६७ | ७०५ | ४०,५८३ | ३२,२४० | ६५,८४० | ४९,५८३ | ५१,०२२ | ६१,२९६ |
| उडीद | २०,०६७ | ९,०२६ | ३१,८३४ | ३३,१४४ | ३३,२३३ | १७,२३४ | २३,१५६ | ३५,८९१ | १८,९९१ | २४,०५१ | २५,२२० |
| मटकी | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| मिरची | १९,५२२ | २५,२३८ | १,७७६ | ४० | १,३५० | १,३६४ | २,२८५ | १६,०५३ | १३ | ३३२ | २२४ |
| चिंच | उ·ना· | ७,६५० | १५,८२६ | २,०५१ | २,०१८ | १,३५६ | ४,२९३ | २,५०७ | ३,२०२ | ३,६६२ | ३,१७२ |
| धने | ७,१३४ | १६,४२७ | ९,४६९ | १५४ | १३ | २,३०२ | १,९१७ | २,८४४ | १,८८६ | १,३३७ | १,६५२ |
| हळद | ७,०४४ | १०,१४७ | ७,९१७ | ६,५९३ | १४ | ८,७०६ | ३,९७५ | ८,६७२ | ८,३७१ | ६,६३५ | ६,७१७ |
| चिंचोका | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| गूळ | १,३५,९७५ | १,८६,२७५ | ५०,७१३ | ८,६९९ | २,९१७ | ५,९२५ | १२,२०२ | १५,६८० | ७,५९२ | ९,२८४ | २३,७४६ |
| कापूस | ८१,७५७ | ३,२८५ | ९,४४५ | ३,३६५ | १०३ | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| कांदा | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ९६६ |
| लसूण | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| बटाटे | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उनना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| एकूण .. | ६,३२,३४६ | २९,४३,८५० | १६,५६,१४८ | ३,८४,८४७ | ९,३८,७४५ | १,४७,८८३ | ४,७८,७११ | २,९१,०३९ | २,३५,५८५ | १,९६,७७४ | १,२७,५५६ |

उ·ना· : उपलब्ध नाही·  आ·ना· : आवक नाही·

.... पुढे चालू ....

सारणी क्रमांक ६·२ पुढे चालू .....

पा·नं·२

(क्विंटल मध्ये)

| | १९७०-७१ | १९७१-७२ | १९७२-७३ | १९७३-७४ | १९७४-७५ | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी(रब्बी) | २७,१२७ | ७७,२८७ | | ४७,८२० | १,३७,४३६ | ७९,९५३ | १,१४,२८३ | २,०७,६७२ | १,८०,१४० | २,५०,३४५ | १,९७,२१६ |
| ज्वारी(खरीप) | उ·ना· | उ·ना· | | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| गहू | ५,८८० | २२,१६४ | | ५,१३८ | १५,४६९ | २३,३५४ | २३,२६४ | ८,६६० | १४,६६१ | १३,०८६ | ११,८६८ |
| जोड | ६,५४४ | ९,५५८ | | १,५४५ | ३,३९३ | ४,३२९ | १,५९४ | १,०९१ | २,७८३ | ३,३५८ | ५,१९८ |
| साळी | १,०८२ | ६५६ | | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ७,२४३ | ३,२५१ | ६,६०९ | १०,२९८ | १३,५६९ |
| बाजरी | २,५८४ | ५१४ | | ३४३ | १,७३० | ३२६ | ८२४ | २,२२० | २,०९२ | २,०७० | १,७८७ |
| वरई | १,१६० | ३०० | | ३,१४६ | ३८१ | ९४२ | २,२१७ | १,७१७ | १,१२३ | १,७१३ | १,३५९ |
| मक्का | ५,७३० | ३,१३१ | | ९,१८९ | २,६१४ | ८,१५५ | ४,४३४ | ५,७४० | २,९६१ | ७,९९३ | ६,४७७ |
| सावा व इतर | १०८ | ३९५ | | १,२४० | १,००८ | १४१ | ४१२ | २१५ | २३९ | ११५ | ७१ |
| हुलगा | १,३३३ | ५०६ | | १,९१८ | ६४९ | १,८८१ | २,३७४ | २,५३४ | ४,२८७ | २,०५३ | [illegible],७३० |
| हरभरा | ४,८५८ | १२,४०४ | | ५,६०८ | ८,९११ | ११,५४२ | ७,२६७ | ७,४६९ | ९,४८३ | १०,५२२ | १३,०७२ |
| तूर | ६७,१२९ | ९,३९६ | | ५०,३७२ | ४९,०४४ | ९८,४६५ | ५४,८४५ | ५७,८४१ | १,१४,९९५ | ९७,३७८ | ९४,१७२ |
| मूग | २४,१३७ | ५,९७५ | | १४,००५ | ११,०२४ | १९,१३७ | ३१,५२९ | १३,५२९ | ८,१६२ | ८,७६२ | ६,२९२ |
| उडीद | १८,२८० | ६५५ | | ४,९६१ | २,५२७ | २,१८६ | ९,६६७ | ५,७६० | २,७१२ | ८,८५५ | २,२३६ |
| मटकी | उ·ना· | उ·ना· | | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ६८६ | १,०८४ | १,३८२ | २२८ |
| मिरची | २,००७ | ८,९२९ | | १,४८२ | १,११९ | १,४८८ | २,१४२ | ४,०४१ | २,७८७ | ३,०६० | १,८६७ |
| चिंच | ८,१८४ | ८,५०१ | | १८३ | ८२८ | ३,२५४ | १८,००४ | ७५८ | २६,०१४ | ६,११५ | २५,७०५ |
| धने | १,१८४ | ४,०६९ | | ५,४०३ | २,२१६ | ९,३९२ | ७,०५२ | ६,५२८ | ६,३३७ | ११,२८३ | ७,८०९ |
| हळद | ७,८७० | १४,२९० | | २,७८६ | ४,६८३ | ९,२५७ | ६,२६,२८८ | ४,८६० | ३,८२२ | ८,८३६ | ११,६८० |
| चिंचोका | उ·ना· | उ·ना· | | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| गूळ | २२,७३० | ८०,०३२ | | १०,१०५ | २६,०११ | ४३,४९५ | ३१,४२९ | १६,००६ | १७,३०३ | १६,७४० | १५,३३६ |
| कापूस | ३ | -- | | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| कांदा | ४,४३९ | ४,५६२ | | ३,११७ | ५,५२२ | ११,८४३ | ६,१५४ | १५,७३० | १२,८२१ | २३,७८८ | १४,३१८ |
| लसूण | उ·ना· | उ·ना· | | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | ५४६ | ३४२ | ५४३ | २२९ |
| बटाटे | उ·ना· | उ·ना· | | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | १,९२५ | २,६०९ | २,८२७ | २,७५३ | १,८९६ |
| तांदूळ | – | – | | – | – | – | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· | उ·ना· |
| एकूण .. | २,१२,३६९ | २,६३,२२४ | | १,६८,३६१ | २,७३,५७३ | ३,०७,६९३ | ७,९८,४१८ | ३,६९,४३५ | ४,२३,५८४ | ४,९१,१२८ | ४,३७,४१४ |

आधार : वार्षिक अहवाल कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, १९५९ ते १९८६-८७

.... पुढे चालू ....

उ·ना· : उपलब्ध नाही·

टीप : १९५९-६० व १९६०-६१ या बाजार वर्षातील आवक पोत्यामध्ये आहे·

सारणी क्रमांक ६•२ पुढे चालू ••••••

पा•नं•३

(क्विंटल मध्ये)

| | १९६२-६३ | १९६३-६४ | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ |
|---|---|---|---|---|---|
| ारी(रब्बी) | १,१३,०५६ | ८२,१५८ | १,१३,०४२ | १,८१,४७० | ८६,८६६ |
| ारी(खरीप) | उ•ना• | उ•ना• | उ•ना• | उ•ना• | उ•ना• |
| हू | ५,५५१ | २,२१५ | १,०७,००० | ६,४४४ | ४,५८४ |
| ड | १,०४८ | ५,२४१ | २,५०७ | १,०११ | ७५० |
| ळी | ७,६६४ | ३,५७१ | --= | २,८३७ | ५,३१४ |
| जरी | ९२२ | ९,४१२ | १,०३२ | ३४५ | १,१८१ |
| ई | ५९१ | ३७२ | उ•ना• | ४९६ | ३७४ |
| ग | ३,१६६ | २,६९६ | उ•ना• | ३,५५८ | ३,६०१ |
| वा व इतर | ५ | ३८ | उ•ना• | ९ | २१ |
| गा | १,२६२ | १,०५७ | उ•ना• | १,८४६ | ७६४ |
| भरा | ७,५१४ | १०,२४७ | ६,४३९ | ५,२३० | २,८०६ |
| | ६०,८२४ | १२,०२८ | ४५,२२२ | ७७,२५६ | २३,५८३ |
| | ९,७६८ | १३,४९२ | ४४,६२४ | ३,५४४ | ७,०३३ |
| ीद | १,९१३ | १,६१७ | २,७२५ | ४,२६५ | ४,८६१ |
| की | १,४०७ | १३,७९५ | --- | ७४५ | ३२० |
| रची | १,३१२ | ८८२ | उ•ना• | ४२७ | २,६६२ |
| ंच | १०,३१२ | ८,६८९ | उ•ना• | १२,१५७ | ८,६३१ |
| े | ४,००० | ८,०८५ | २०,०२२ | १२,४५९ | ११,४६८ |
| द | ३,९४५ | ६,२२८ | ६,५४६ | ५,१३३ | ७,८४१ |
| वंचोका | उ•ना• | १०० | उ•ना• | उ•ना• | १९१ |
| क | १८,८९३ | ७,१८४ | ११,८२७ | १०,१९८ | ८,९९१ |
| ापूस | उ•ना• | उ•ना• | उ•ना• | उ•ना• | उ•ना• |
| ादा | १३,२६२ | १६,६२० | उ•ना• | २०,१३१ | ३५,९७३ |
| सूण | ६,८८९ | २७० | उ•ना• | ३५७ | १०६ |
| टाटे | ३,५८८ | २,११ | उ•ना• | २,७१४ | ३८४० |
| ादूळ | उ•ना• | ४१० | उ•ना• | २,४६० | १,२७५ |
| एकूण •• | २,७३,८९३ | २,१५,५५९ | २,६४,६८६ | ३,५५,०९९ | २,३३,०३६ |

उ•ना• : उपलब्ध नाही•

७,६९,७७६ क्विंटल इतकी होती. विश्लेषण काळात ज्वारीची सर्वात कमी आवक १९६४-६५ साली २,८९० क्विंटल इतकी होती. रब्बी पीकापैकी हरभ-याची आवक सर्वात कमी म्हणजे ३,७३१ क्विंटल इतकी होती. त्यावरुन रब्बी हंगामास अनुकूल वातावरण नव्हते हे स्पष्ट दिसून येते. ज्वारीच्या आवकामध्ये कमी जास्त प्रमाणात चढ उतार होत असले तरीही इतर शेतमाला-पेक्षा जास्त आहे.

१९६१-६२ या वर्षी २,६५,३६२ क्विंटल इतकी ज्वारीची आवक होती. ती १९६५-६६ साली ६४,६३२ क्विंटल झाली. म्हणजे २,००,७३० क्विंटल इतकी घट झाली. तसेच १९७१-७२ साली ७७,२८७ क्विंटल आवक होती, ती १९७५-७६ साली ७९,९५३ झाली, म्हणजे २,६६६ क्विंटलची वाढ झाली. १९७६-७७ च्या नंतर मात्र ज्वारीच्या आवकामध्ये सातत्याने वाढच होत असल्याचे दिसते.

१९६१-६२, १९६५-६६, १९७०-७१, १९७५-७६, १९८०-८१ व १९८५-८६ या वर्षात गव्हाची आवक अनुक्रमे १२,७३५ क्विंटल, ५,६२८ क्विंटल, ५,८८० क्विंटल, २३,३५४ क्विंटल, ११,८६८ क्विंटल, ६,४४४ क्विंटल अशी होती. १९६५-६६ ते १९७०-७१ या काळात गव्हाच्या आवकामध्ये घट दिसते. त्यानंतर १९८०-८१ मध्ये गव्हाची वाढीव दराने आवक झाली. तथापि १९८४-८५ नंतर रब्बी हंगामास पुरेसा व वेळेवर पाऊस न झाल्याने, १९८५-८६ च्या हंगामात गव्हाची आवक घटली. दरम्यानच्या काळात गव्हाला चांगला भाव असून सुध्दा नैसर्गिक प्रतिकुलतेमुळे आवक वाढली नाही.

बार्शी तालुक्यात, ज्वारीनंतर दररोजच्या आहारात बाजरीचा वापर होतो. तरीसुध्दा बाजारातील बाजरीची आवक जास्त नाही. याची कारणे पुढील प्रमाणे :-

१) शेतक-यांनी बाजरी पीकांऐवजी संकरीत पीके घेण्यास सुरुवात केली,

२) बाजरीचे क्षेत्र कमी, परिणामी उत्पादनही कमी आहे·

३) बाजरीचे बाजाराधिक्य फारच कमी आहे· म्हणूनच १९७५-७६साली सर्वात कमी म्हणजे ३२६ क्विंटलची आवक झाली आणि जास्तीत जास्त १९८३-८४ साली, ९,४१२ क्विंटल पर्यंत वाढली· ही वाढ सुध्दा तशी अल्पच आहे·

बार्शी बाजार समितीला १·११·१९५१ पासून तूर, मूग, उडीद नियमित करण्याची मान्यता मिळाली· बाजार आवारात ज्या सहा शेतमालाचे प्रमाणीकरण करण्यात येते त्यामध्ये तूर, मुग, उडीद या शेतमालाचा समावेश आहे· म्हणजेच वरील शेतमालाच्या उलाढालीवर बाजार समितीचे विशेष लक्ष असल्याचे स्पष्ट आहे·

१९६१-६२ साली तूरीची १,३०,१८५ क्विंटल आवक होती· ती १९६५-६६ साली ३,१५,१६० क्विंटल पर्यंत वाढली, म्हणजे १,८४,९७५ क्विंटलची निव्वळ वाढ झाली· मात्र १९७०-७१ च्या मध्ये तूरीची आवक कमी झाली, कारण खरीप हंगामात पाऊस वेळेवर न झाल्यामुळे तूरीच्या लागवडीचे क्षेत्र कमी झाले· साधारणपणे १९७०-७१ नंतर तूरीची आवक कमी झाली असली तरीही ती स्थिर स्वरुपाची आहे· तुलनेने तूरीच्या लागवडीचे क्षेत्र मात्र अधिक आहे· टंचाईच्यावेळी रोख पैसे मिळवून देणारे या भागातील हे पीक आहे· तिच्या कमी आवकाची प्रमुख कारणे असे आहे· बार्शी शहरात डाळीचे एकूण २० कारखाने आहेत· बाजार आवारातील कर चुकविण्यासाठी डाळ कारखानदार बाजाराच्या वाटेवर असलेल्या शेतक-यांच्या बैलगाडया अडवून तूर खरेदी करतात· शेतकरी सुध्दा बाजार आवारातील चाळण, तोलाई, हमाली, अडत आणि शेतमालाची पट्टी मिळेपर्यंतची दिरंगाई टाळण्यासाठी डाळ कारखानदारांना तूर विकून टाकतात आणि विशेष म्हणजे डाळ कारखानदारांकडून भावसुध्दा चांगला मिळतो· अशाप्रकारे बाजार आवार सोडून बाहेरच्या बाहेरच हा व्यवहार होत असल्यामुळे बाजार समितीच्या आवारातील तूरीची आवक कमी आहे·

१९६०-६१मध्ये मूगाची ६२१८९पोत्याची(क्विंटल)आवक होती,ती७०-७१

मध्ये २४,१३७ क्विंटल झाली म्हणजे ३८,०५२ क्विंटल आवक कमी झाली· १९८०-८१ व १९८५-८६ या वर्षी मूगाची आवक अनुक्रमे ६,२९२ क्विंटल व ३,५४४ क्विंटल इतकी होती·

इ·सन १९६०-६१, १९७०-७१, १९८०-८१ आणि १९८५-८६ मध्ये उडीदाची आवक अनुक्रमे ९,०२६ पोते (क्विंटल) १८,२८० क्विंटल, २,२३६ क्विंटल आणि ४,२६२ क्विंटल अशी होती· उडीदाची आवक सातत्याने वाढत आहे, कारण, १) उडीदाला चांगला दर मिळत आहे,

२) बार्शी तालुक्यातील शेतकरी रब्बी ज्वारीच्या जमिनीवर पूर्वी एकच ज्वारीचे पीक घेत होता· त्याठिकाणी उडीदाचे पीक घेण्याचे अलिकडेच सुरु झाले आहे·

३) उच्च पैदास बी-बियाणामध्ये लवकर व अधिक उत्पादन देणा-या उडीदाच्या जाती शेतक-याच्यापर्यंत पोहोचल्या आहेत·

१९७७ पासून मटकी नियमित झाली आणि त्यानंतर तिची आवक वाढत आहे· १९७७-७८ मध्ये मटकीची आवक ६८६ क्विंटल होती, तर १९८२-८३ मध्ये ती १४०७ क्विंटल पर्यंत वाढली आणि १९८३-८४ पर्यंत १३,७९५ क्विंटल पर्यंत वाढली·

बार्शी बाजार आवारातील मिरची, धने व चिंच या शेतमालाची आवक सतत वाढत आहे· १९६१-६२ मध्ये मिरचीची आवक १७७६ क्विंटल, चिंचेची आवक १५,८२६ क्विंटल आणि धनेची आवक ९,४६९ क्विंटल अशी होती· १९७०-७१ मध्ये मिरची २,००७ क्विंटल, चिंच ८,१८४ क्विंटल आणि धने १,१८४ क्विंटल इतकी आवक होती· आणि १९८०-८१ मध्ये मिरची १८६७ क्विंटल चिंच २५,७०५ क्विंटल आणि धने ७,८०९ क्विंटल याप्रमाणात आवक राहीली म्हणजे एखाद्या वर्षी आवक कमी झाली तरी सर्वसाधारण आवक प्रवृत्ती वाढत जाणारीच आहे·

दि.२७.५.१९५५ पासून हळद नियमित करण्याची मान्यता बाजार समितीला मिळाली. सुरुवातीपासूनच हळदीची आवक ब-यापैकी आहे. १९६१-६२, १९७०-७१, १९८०-८१ व १९८५-८६ मध्ये अनुक्रमे ७,९९७ क्विंटल, ७,८७० क्विंटल, ११,६८० क्विंटल, आणि ५,१३३ क्विंटल हळदीची आवक होती. १९६३-६४ साली हळदीची सर्वात कमी आवक १४ क्विंटल इतकी होती. आणि १९७६-७७ साली सर्वात जास्त ६,२६,२८८ क्विंटलची आवक होती.

बार्शी बाजार समितीने हळदीच्या व्यवहारात सुधारणा घडवून आणल्यास आणखी आवक वाढेल. उदा. सांगली बाजार आवारात ज्या पध्दतीने हळदीची विक्री होते, तशी विक्री बार्शी बाजार आवारात होणे आवश्यक आहे. शेतकरी,हळदीच्या पिकास " चोरटे पीक " असे म्हणतात, कारण ५ क्विंटल ओली हळद असेल तर शिजवून, वाळवून त्याचे वजन एक क्विंटल होते. शिवाय पॉलीश केल्यास आणखी ५ ते ७ किलोची घट होते. पॉलीश शिवाय हळदीची विक्री होत नाही. सांगली बाजारात मात्र विनापॉलीश हळदीची विक्री होते. आणि बार्शी पेक्षा जास्त भाव सुध्दा मिळतो. त्यामुळे कांही शेतकरी एकत्र येऊन हळद मालाची भरती करुन घेऊन सांगली कडे घेऊन जातात.

१९६१-६२ मध्ये गूळाची आवक ५०,७१३ क्विंटल होती आणि १९७०-७१ मध्ये ही आवक २२,७३० क्विंटल झाली म्हणजे घट झाली. इ.सन १९८०-८१ मध्ये गूळाची १५,६३६ क्विंटल आवक होती, ती १९८५-८६ मध्ये १०,१९८ क्विंटलनी कमी झाली. तरी सुध्दा बाजार आवारातील गूळाची आवक सम प्रमाणात टिकून असल्याचे दिसते. (सारणी क्रमांक ६.२ पहा)

९.७.१९४७ पासून कापूस व कापसापासून निघालेल्या रुईचे नियमित करण्याची शासनाकडून परवानगी मिळाली. सुरुवातीच्या काळात कापसाची आवक बरी होती. त्यामुळे कापसावर प्रक्रिया करणारे, सूतगिरण्यांची स्थापना झाली. शिवाय हातमागही निघाले. साधारणत: १९६२-६३ पर्यंत कापसाची आवक टिकून राहीली. त्यानंतर मात्र कापसाची आवक पूर्णपणे बंदच झाली,

कारण सरकारने एकाधिकार खरेदी योजनांमार्फत कापसाची खरेदी करण्यास सुरुवात केली. तरी सुध्दा कांही काळानंतर एकाधिकार खरेदी केंद्रसुध्दा बंद पडली. दोन्हीकडे कापसाची आवक कमी होण्याचे कारण म्हणजे, शेतक-यांचा पीक आकृतीबंधात पूर्णपणे बदल झाला. १९६२-६३ साली कापसाची आवक ३,३६५ क्विंटल होती ती १९६३-६४ मध्ये १०३ क्विंटल आणि १९७०-७१ मध्ये फक्त ३ क्विंटल आवक होती. त्यानंतर कापसाची आवक बंद झाली.

१९६९ नंतर कांदा नियमित झाला. तेंव्हापासून कांद्याची आवक सतत वाढत आहे. सन १९६९-७०, १९८०-८१, १९८५-८६, १९८६-८७ मध्ये कांद्याची आवक अनुक्रमे ९६६ क्विंटल, १४,३१८ क्विंटल, २०,१३१ क्विंटल, ३५,९७२ क्विंटल याप्रमाणात वाढत गेले आहे.

१९७७ पासून लसूण व बटाटा नियमित झाले. तेंव्हापासून त्यांची आवक सतत वाढत आहे. १९७७-७८ साली लसणाची आवक५४६ क्विंटल व बटाटयाची आवक २५०९ क्विंटल झाली. १९८२-८३ मध्ये लसणाचे ६,८८९ क्विंटल आणि बटाटयाची ३,५८८ क्विंटलनी आवक वाढली.

१९६१-६२ ते १९८६-८७ या काळापर्यंतची आकडेवारी उपलब्ध असणा-या २४ वर्षात तेलबिया वगळून सर्व शेतमालाची एकूण आवक ९६,०४,७६० क्विंटल इतकी झाली म्हणजे आवकाची वार्षिक सरासरी ४,००,१९८.३३ क्विंटल इतकी होते.

विश्लेषण काळात सर्वात अधिक आवक १९६१-६२, १९६३-६४,१९७६-७७ या वर्षी आहे. म्हणजे अनुक्रमे १६,५६,१४८ क्विंटल, ९,३८,७४५ क्विंटल व ७,९८,४१८ क्विंटल इतकी होते आणि सर्वात कमी आवक असणारी वर्षे, किंबहुना सरासरी पेक्षा कमी आवक असणारी वर्षे, १९६४-६५, १९७३-७४, १९६८-६९यावर्षी एकूण आवक खूपच कमी होती, म्हणजे अनुक्रमे १,४७,८८३ क्विंटल १,६८,३६१ क्विंटल, १,९६,७७४ क्विंटल इतकी होती. १९६२-६३, १९६५-६६, १९६८-६९, १९७०-७१, १९७१-७२, १९७७-७८ व या नंतरची सर्व वर्षे सरासरी आवकापेक्षा

कमी आवक असणारी वर्षे आहेत.

बाजरी, वरई यासारख्या शेतमालाची आवक मात्र कमी होत आहे. तर मका, धने, मिरची, मटकी, मूग, उडीद, कांदा, लसूण, बटाटे इत्यादी शेतमालाची आवक वाढत आहे. सोबत ज ज्वारी, गहू, हळद, गूळ, या शेतमालाची आवक मात्र टिकून आहे. थोडक्यात पाऊसमान, हवामान आणि बाजारातील भाव हे शेतमालाच्या आवकावर परिणाम करणारे घटक आहेत.

हरितक्रांतीमुळे उच्चपैदास बी-बियाणे शेतक-यांपर्यंत जाऊन पोहोचलेली आहेल. अर्थात अशा बियांणांच्या वापरावरही मर्यादा पडतात. उदा.पाऊसमान , बियाणांच्या किंमती, रोगराई, हंगाम, जलसिंचनाच्या सोई इत्यादी, लहानात लहान शेतक-यांचे, लहान प्रमाणात व्यक्त होणारे बाजाराधिक्यसुद्दा बाजारात आले पाहिजे. त्यादृष्टीने बाजार यंत्रणा निर्माण होणे आवश्यक आहे.

## ६.३ बाजार आवारातील शेतमालांची किंमत :

बार्शी बाजार आवारात तेलबिया सोडून बाकीच्या शेतमालाची प्रत्येक वर्षाची एकंदर किंमत आणि प्रतिक्विंटल किंमत सारणी क्रमांक ६.३ मध्ये दर्शविली आहे.

सारणी क्रमांक ६.३ मध्ये हे स्पष्ट होते की, शेतमालाची प्राप्त होणारी एकंदर किंमत इ.स.१९७९-८०, १९८०-८१, १९८२-८३ या वर्षी अनुक्रमे रुपये १२,३६,२०,४७८/- रुपये १०,०८,९२,७४७/- रुपये १२,६५,६४,०५५ इतकी होती, आणि ती सर्वात जास्त किंमत (शेतमालातील) होती. सर्वात कमी किंमत इ.स.१९६४-६५, १९७१-७२, व १९६०-६१/ या वर्षी अनुक्रमे रुपये १,४६,४७,६८७/- रुपये १,७०,२८,७८६/- रुपये २,२४,११,५३३/- इतक्या रुपयापर्यंत होती.

१९७५-७६ या वर्षापासून शेतमालाच्या एकूण प्राप्त किंमतीत

## सारणी क्रमांक ६·१

### बार्शी कृषि उत्पन्न बाजार आवारातील शेतमालाची किंमत (रुपयामध्ये)

| | १९५९-६० | १९६०-६१ | १९६१-६२ | १९६३-६४ | १९६४-६५ | १९६५-६६ | १९६६-६७ | १९६७-६८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी (रब्बी) | ७४,५४,१०३ | ९७,५९,७७३ | १,०५,९३,४५९ | ४०,७३,२२९ | १,४०,६१९ | २९,३७,०१९ | ४७,८४,३३० | २४,२७,४५९ |
| ज्वारी (खरीप) | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| गहू | १२,७९,९२१ | ७,८१,४६१ | ७,९१,५८९ | ५,६२,१४६ | ९,३०,५५३ | ६,६५,०५९ | ५,९६,९०३ | ४,९३,०४७ |
| जोड | ४,४४,३८४ | ३,३१,९२७ | २,४१,८०१ | १,३५,७६३ | ४,९४,९३१ | २,२८,१२५ | ३,५१,६०१ | ३,०८,३५३ |
| साळी | - | - | २,५०,६०९ | ३,६९,८४३ | १,२९,३१९ | ३,२३७ | उ·ना· | १९,३५३ |
| बाजरी | १,००,१२९ | ७,०४,०२० | ९९,८३० | ४०,५४३ | ५१,४६० | ४,९६,२०० | ४,४१,१८९ | ५,९८,२५५ |
| वरई (राळे) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| मका | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| सावा व इतर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| हुलगा | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| हरभरा | ३,३६,०४२ | ५,३८,७५७ | ३,३०,७९३ | २,२६,०६० | ४,९४,९३१ | ६,२४,०२९ | १४,६६,९५० | ८,९५,१९२ |
| तूर | ४०,४६,९७३ | ३०,६३,२२२ | ५४,८२,१९२ | ६४,६२,९९० | ५२,८८,०८८ | २६,००,३०३ | ३०,३३,४३६ | ८४,५५,७१३ |
| मूग | ३५,०९,८६२ | ३०,४२,६४४ | ५६,२९,८२८ | ३२,८१,१८२ | ३९,९९,८०६ | ४७,७२,९४९ | ८६,३३,२७२ | ६६,१७,७१७ |
| उडीद | ७,७१,६८८ | ८,६५,७७० | १७,९०,३०५ | १९,६१,८२९ | ६,४१,७१० | १६,७८,३९५ | ५०,४८,००७ | २७,००,५२८ |
| मटकी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| मिरची | १,४६,६२५ | -- | ७,४७,१८४ | ४०,०१५ | २,२०,५५५ | ६,२९,१३१ | १६,१८,१४३ | ३,३३९ |
| चिंच | -- | ८,४१,६५० | ६,९३,१९६ | १,४२,३३३ | २,३७,८४८ | ६,२५,७३६ | ६,२७,०६२ | ४,५६,०४९ |
| धने | ३,०३,८०५ | -- | ६,३१,९०९ | -- | ५,३१,०६५ | ४,०२,३८२ | ३,८०,७८४ | २,६७,१३१ |
| हळद | -- | ८,४१,६५० | ११,४८,७८० | -- | १०,८१,७०५ | ९,५२,११४ | १०,५५,७३९ | १८,५५,४८२ |
| चिंचोका | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गूळ | ६,९५,३६७ | १,२१,०८४ | १४,४०,२२३ | २,२८,३६९ | ३७,७५,०९७ | ४,८७,७२० | ४,४३,६३७ | १३,६०,३९० |
| कापूस | १५,४१,५१६ | ४,४७,७७५ | ८,७७,२६८ | १८,४६६ | -- | -- | -- | -- |
| कांदा | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| लसूण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| बटाटे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| तांदूळ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| एकूण .. | २,०६,३०,४१५ | २,२४,३१,५३३ | ३,०६,१९,२६५ | १,७५,३२,८०३ | १,३६,४७,६८७ | १,७१,६२,५५२ | २,८४,८०,९५३ | २,६५,३५,८०८ |

सारणी क्रमांक ६·३ पुढे चालू ···

| | १९६८-६९ | १९६९-७० | १९७०-७१ | १९७१-७२ | १९७३-७४ | १९७४-७५ | १९७५-७६ | १९७६-७७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी(रब्बी) | -- | -- | २७,४१,६५२ | १५,४६,३२९ | ७४,११,००३ | २,५१,५८,२५७ | १,२४,४०,१८० | १,५२,७७,९६८ |
| ज्वारी(खरीप) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गहू | ५,०८,३८३ | ६,२६,००५ | ६,००,४६६ | १७,०५,०८२ | १०,९९,९६८ | २९,७९,८३० | ३४,८७,०९१ | ३०,६०,५०५ |
| जोड | ३,९४,६८८ | ३,६९,८६७ | ३,७५,६१४ | १७,०२,८४८ | २,३३,१९६ | ५,०१,९०४ | ४,७२,७९६ | २,०४,०८१ |
| साळी | बा·ना· | बा·ना· | ८१,३१४ | ३३,५१३ | -- | -- | १२,७७,३२७ | ८,८७,८४१ |
| बाजरी | ८,६१,६०१ | २,९५,३५२ | १,९६,४०५ | ५६,०२८ | ३८,१४३ | २,०५,४७८ | उ·ना· | ८७,३२४ |
| वरई (राळे) | -- | ८०,८०७ | ६५,३७२ | १८,४२७ | ३,५४,१५३ | ३८,१७२ | ८९,१७९ | १,८३,९६२ |
| मका | -- | १,८८,८७६ | ३,८८,१०९ | २,६४,९६० | १२,३३,०६१ | ३,५७,२०८ | ७,९६,१२६ | ४,५५,७१० |
| सावा व इतर | -- | १६,७३९ | ६,४२५ | ३१,१०८ | १,५६,४९८ | १,६४,३५० | ११,६४८ | ३४,२७२ |
| हुलगा | -- | ७,३४,८८१ | ७४,६३५ | १,६३,८९६ | २,०४,२५३ | ७६,६१६ | १,५२,९७५ | २,६४,१९१ |
| हरभरा | ६,६५,७७६ | ७,२७,९८३ | ४,०१,८२८ | १४,१९,२६२ | ११,४६,८१४ | १६,९१,८४८ | १४,७५,७३७ | १०,४७,६७८ |
| तूर | ५८,४२,११७ | ४२,५४,१९४ | ७३,७७,३१५ | १०,६२,३५८ | ८४,६४,७५६ | १,०६,९६,५९५ | ९७,१७,७१६ | १,२७,२६,१४६ |
| मुग | ६५,७९,००६ | ७१,९६,८६६ | २४,०३,२०५ | २३,७१,४०१ | २६,५७,१०४ | २१,५९,८१९ | २८,३५,३९० | ५८,५८,४६४ |
| उडीद | २२,३३,८४९ | १९,०९,६६७ | १९,७९,७४३ | ८,१६,१४७ | ७,५५,०४० | ४,६९,९४१ | ३,५६,२६८ | २३,७३,२८७ |
| मटकी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| मिरची | १,०६,७८१ | १,०३,७१६ | ८,७७,८५१ | १२,४५,६८८ | ६,८४,००७ | १०,११,७७८ | ९,४३,८१९ | ११,२८,३७३ |
| मिंच | ३,३७,९६६ | ६,४५,८४६ | ११,३९,९१४ | १०,७३,७२२ | ८९,७०३ | ९०,५२७ | ९,००,४०८ | ४७,७१,०४५ |
| धने | २,२८,९७६ | ४,०४,३४१ | २,९७,१७२ | ६,५१,४७२ | ११,९५,३०४ | ६,९९,७१६ | ४३,९९,७८५ | ३९,६०,०९० |
| हळद | २९,५७,३०० | २,९२,२२५ | ११,९४,३५३ | ६,६२,७२९ | १०,३७,३१३ | १६,०५,०४५ | २३,७१,५९२ | ३६,८४,४८३ |
| चिंचोका | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गूळ | ७,३६,८७४ | ११,०९,९०८ | २१,३९,९६४ | २१,६८,०४३ | १७,६९,४१५ | ४०,७९,६९० | ६,२६,६१६ | ४७,९८,७८० |
| कापूस | -- | -- | ६६१ | -- | -- | -- | -- | -- |
| कांदा | -- | ३१,६०१ | ८१,४३७ | ३५,०६३ | १,१८,५५९ | २,३४,६०७ | ४,०३,४७४ | ३,२९,६०३ |
| लसूण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| बटाटा | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| तांदूळ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| एकूण ·· | २,१७,५६,७०७ | १,८८,८८,९४४ | २,३४,२३,४३४ | १,७०,२८,७८३ | २,९६,४८,२९५ | ५,२२,१८,३८१ | ३४,०१,९८२ | ६,०२,३३,८०६ |

सारणी क्रमांक ६.३ पुढे चालू ...

| | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८२-८३ | १९८५-८६ | १९८६-८७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी(रब्बी) | २,६७,५६,३३४ | २,१७,४६,९१७ | ६,६०,३६,९९२ | ३,०७,५०,४०१ | २,३०,८३,४१३ | ३,९२,७३,१६५ | १,५४,००,८३७ |
| ज्वारी(खरीप) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गहू | १३,६८,२५२ | १९,८१,४३४ | २०,८१,२८१ | २,३१,३३,२९९ | १३,३६,१६६ | १८,१०,२३३ | १३,६३,६४३ |
| जोंड | १,५५,२१३ | ३,१४,०१४ | ४,२३,९२८ | ८,३७,८३१ | २,१३,९०० | २,२१,९९४ | ६१,७५९ |
| साळी | ६,३७,७०५ | ६,६६,५४१ | ११,९३,०८२ | १६,६२,२३६ | १४,३६,३५२ | १०,११,६१३ | ८,५८,६२३ |
| बाजरी | २,३९,५९६ | २,०२,३११ | २,४७,८९३ | २,४२,५९० | १,३०,५७९ | ९८,१८४ | २,०५,२९४ |
| वरई (राळे) | १,५५,१७९ | ७४,२२६ | १,३२,५२९ | १,३७,५६० | ६४,८०१ | ७०,८५३ | ६१,७५९ |
| मका | ५,३१,७३५ | २,७३,९३३ | ८,९४,६१४ | ७,०१,४८९ | ४,४७,५०५ | ६,५०,०९० | ५,४९,३०५ |
| सावा व इतर | १५,४५५ | १६,०९१ | ९,४५५ | ८,२२४ | ८३३ | १,७०५ | ३,५२९ |
| हुलगा | २,३५,२०८ | ३,२८,११७ | २,२६,९८८ | ३,४२,३२५ | १,९२,९६१ | ४,१०,१९४ | २,००,२९८ |
| हरभरा | १५,१७,४३८ | १९,१४,४९१ | २४,९७,४२९ | ४७,०१,८५५ | १८,८९,२५५ | २२,१५,९९३ | १०,७९,८१० |
| तूर | १,६७,९२,२६९ | ३,१४,३१,९०८ | २,५३,२१,४०२ | २,९९,२५,८३६ | २,३६,६४,२०८ | २,०६,९७,०६३ | १,५१,४८,०९६ |
| मूग | २३,३०,८९४ | २५,९७,०८५ | २२,६९,८९४ | १९,४०,३०० | २८,०३,२३८ | १३,९७,३२३ | २९,६१,१५९ |
| उडीद | १५,२५,७५० | ६,२३,६६९ | १९,००,३८९ | ५,४४,३४० | ५,८८,४२४ | २०,२४,००२ | २१,६९,३०६ |
| मटकी | १,२४,८०८ | २,१८,१८० | ३,०३,१०२ | ८६,७९७ | ३,५३,३३८ | ३,३१,०६२ | ४,६१,५५९ |
| मिरची | १८,६३,४७४ | १४,५१,८६६ | १७,८४,९९७ | २,४३,२४४ | ७,०२,३०१ | ३,७९,९३५ | १४,८३,९१० |
| चिंच | ३,०६,९३० | ९९,०८,७०० | ४१,७९,२२७ | १,३१,३३,६५४ | ३३,६१,२६३ | १०,४४,१३५ | ५३,२६,२८६ |
| धने | २७,४९,०८८ | ११,४९,९०० | ३१,५७,९३३ | ४३,३५,८२५ | ३१,३०,३६४ | १,६४,२९,०३५ | १,७६,२७,५०० |
| हळद | ३२,८७,५३१ | १५,०३,६३९ | ४२,८१,१८६ | २७,४८,९३१ | २८,६९,७६२ | १५,६५,५५१ | ६०,१५,०६४ |
| चिंचोका | -- | -- | -- | -- | -- | -- | ११,८२५ |
| गूळ | १६,०४,१२० | १८,५०,६९१ | ४४,५७,६५० | ४८,७८,६०३ | ३६,०८,४९२ | १४,२२,१८३ | ३८,५५,१८६ |
| कापूस | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| कांदा | ६,८२,०१० | ५,६७,२३७ | १७,६२,३६७ | ६,२१,२९८ | ८,५८,८७५ | १९,२२,३९९ | ३६,५९,४७७ |
| लसूण | २,००,४६५ | १,१८,९३० | ९१,२१४ | ४५,१६५ | १८,०३१ | १,४४,९०० | २,००,८०० |
| बटाटे | २,७०,८३५ | २,३७,७७३ | ३,२७,११६ | २,२१,६३४ | ४,९४,३९२ | ५,३१,२५३ | ८,२१,०६२ |
| तांदूळ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४,८२,९२० |
| एकूण .. | ६,३४,२०,३५९ | ७,३२,४८,५६५ | १२,३६,२०,४७८ | १०,०८,९२,७४७ | १२,६५,६४,०५५ | १०,२६,५३,०३३ | ७,९९,७९,४४६ |

टीप : (१) १९५९-६० व १९६०-६१ या वर्षातील एकूण किंमत पोत्यांची आहे. (२) १९५९-६० ची आकडेवारी बार्शी मुख्य आवार व वैराग उपआवार या दोन्हींची एकत्रित आहे. (३) १९७४-७५ ची आकडेवारी बार्शी मुख्य आवार व वैराग, येडशी, तडवळे या उप बाजार आवारातील एकत्रित आहे. (४) १९८५-८६ पासूनची आकडेवारी बार्शी मुख्य आवार आणि वैराग उपआवार या दोन्हींची आहे. (५) आ.ना. = आवक नाही. (६) उ.ना. = उपलब्ध नाही.

सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते. १९७४-७५ पर्यंत पाऊसाचे प्रमाण कमी असल्यामुळे शेतमालाचे उत्पादनही कमी झाले. तुलनेने मागणी मात्र सातत्याने वाढत गेली आणि म्हणूनच किंमती मात्र वाढत गेल्या. विशेषत: सर्वसामान्य लहान शेतकऱ्याचे बाजाराधिक्य कमी होत गेले हेही विसरुन चालणार नाही. मोठ्या शेतकऱ्यांनी हरितक्रांतीचा खरा फायदा घेतला पण ते अन्नधान्याचे उत्पादन न करता नगदी पीकांची लागवड करु लागले. उदाहरणार्थ उस, हळद, द्राक्षे, इत्यादी व्यापारी पीकांवर शेतकऱ्यांनी लक्ष केंद्रीत केले. पुरवठ्यापेक्षा मागणी वाढत गेल्याने प्रत्येक शेतमालाच्या दर क्विंटलच्या किंमती वाढत गेल्या आणि शेतमालाची एकूण प्राप्त किंमत इ.स. १९७५-७६ नंतर वाढत गेली.

६.४ बाजार आवारात शेतमालाला मिळणारी प्रति क्विंटलची किंमत :

बार्शी कृषी उत्पन्न बाजार आवारामध्ये येणाऱ्या प्रत्येक शेतमालाची दर क्विंटलची सरासरी किंमत सारणी क्रमांक ६.४ मध्ये दर्शविली आहे. यासाठी मोजकी अशी ६ वर्षे विश्लेषणासाठी घेतलेली आहेत.

१९६१-६२ या वर्षी सर्व शेतमालाची प्रतिक्विंटल सरासरी किंमत रुपये १०० (शंभर) च्या आत होती. परंतु १९८५-८६ मध्ये ती किंमत चार ते दहा पटींनी वाढल्याचे दिसते.

१९७०-७१ साली ज्वारी, गहू, जोड, साळी (भात), बाजरी, वरई, मका, सावा आणि हुलगा या शेतमालांची प्रतिक्विंटलची सरासरी अनुक्रमे रु.१०१/- रु.१०३.११, रु.५७.४०, रु.७५.१५, रु.७६/-, रु.५६.३५, रु.६७.७५ रु.५९.५० आणि रु.५६/- या प्रमाणे होती. तर इ.स.१९८०-८१ मध्ये वरील वस्तुंची किंमत अनुक्रमे रु.१५५.९२, रु.१९४.९१, रु.१६६.९८, रु.१२२.५०, रु.१३५.७५, रु.१०१.२२, रु.११९.१४, रु.११५.८३ आणि रु.१३५.७९ या दरांनी वाढली.

१९७०-७१ या वर्षाच्यां किंमतीच्या तुलनेने १९८५-८६ सालातील शेतमालाची प्रतिक्विंटल किंमत खूप वेगाने वाढल्याचे दिसते. तूरीची प्रतिक्विंटल

सारणी क्रमांक ६·४ — कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी मधील शेतमालाची दर क्विंटल किंमत

( रुपये मध्ये )

| | १९६१-६२ | १९६५-६६ | १९७०-७१ | १९७५-७६ | १९८०-८१ | १९८५-८६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ज्वारी (रब्बी) | ३९·१२ | ४६ | १०१ | १५५·६० | १५५·९२ | २१६·४० |
| ज्वारी (खरीप) | - | - | - | - | - | - |
| गहू | ६२·१५ | ११८ | १०३· ३१ | १५९·३१ | १९४·९१ | २८०·९१ |
| जोंड | ४२·७३ | ६५·४४ | ५७·४० | १५०·४० | १६६·९८ | २१९·५७ |
| नाकी | ३५·४३ | ५१ | ७५·१५ | उ·ना· | १२२·५० | १७३·३१ |
| बाजरी | ४१·८७ | ५१ | ७६·०० | ९४·६७ | १३५·७५ | २८४·५९ |
| वरई | -- | -- | ५६·३५ | ९८·०० | १०१·२२ | १३२·८४ |
| मका | -- | -- | ६७·७५ | ८२·६० | ११९·१४ | १८२·७१ |
| नावा | -- | -- | ५९·५० | ९१·९५ | ११५·८३ | १८९·४४ |
| हुलगा | -- | -- | ५६·०० | १२७·८५ | १३५·७९ | २२०·२० |
| हरभरा | ३८·५७ | १२५·७३ | ८२·७२ | १४२ | ३६५ | ४२३·७० |
| तूर | ४२·११ | ८२·५० | ११० | १४९·२६ | ३१७·७७ | ३५८·५१ |
| मूग | ५१·१० | ८८·६५ | १०० | १६३ | ३०८·३० | ३९४·२८ |
| उडीद | ५६·२४ | ७२·४८ | १७८ | १४९·२६ | २४३·५५ | ४७४·५७ |
| करडी | -- | -- | -- | -- | ३२०·६८ | ४४४·३७ |
| मिरची | ४२०·७१ | २७५·३३ | ४३४ | ६३४·३० | ९३०·२५ | ८८९·७७ |
| चिंच | ४७·७७ | १४५·७५ | १३९·२८ | २७६·७० | ५१०·८९ | ८५·८८ |
| धने | ६६·७३ | १०९·९० | २४९ | ४६८·४६ | -- | १३१८·६५ |
| हळद | १४५·१० | २३९·५३ | १५२ | २५६·२० | २३५·३५ | ३०४·८९ |
| चिंचोका | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गूळ | २८·३९ | ३९·९७ | ९५ | १५२·३५ | ३१२·०० | ३२५·५७ |
| कापूस | ९२·८८ | -- | २२० | -- | -- | -- |
| कांदा | -- | -- | ९८·३५ | ३४·०० | ४३·३९ | ५५·४९ |
| बटाटे | -- | -- | -- | -- | ११९८·२२ | ४०६ |
| बटाटे | -- | -- | -- | -- | ११६·२२ | १२५·७४ |

उ·ना· : उपलब्ध नाही·

किंमत रु.२४८.५१, मुगाची प्रतिक्विंटल किंमत रु.२९४.२७, मिरची रु.४५५.७७, धने रु.१,०६९.६५, हळद रु.१५२.८९, गूळ रु.२४०.५७, आणि कांदा रु.७७.१४ या प्रमाणात वाढल्या. अपवाद फक्त चिंचेची त्याची किंमत १९७०-७१ पेक्षा १९८५-८६ साली कमी झाली ( रु.५३.४).

## ६.५ शेतमालाचे प्रमाणीकरण :

शेतमालाच्या गुणवत्तेनुसार शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळावी म्हणून १९६२ पासून बार्शी बाजार आवारात प्रमाणीकरणाची पध्दत सुरू झाली. शेंगा, तूर, मूग, उडीद, हळद व ज्वारी या सहा शेतमालाचे प्रमाणीकरण केले जाते. १९७१-७२ पासून हळद या शेतमालाची प्रतवारी करण्याची सुरुवात झाली.

इ.स.१९६२-६३ साली एकंदर १,७८,३६५ क्विंटल शेतमालाचे प्रमाणीकरण करण्यात आले. त्यामध्ये शेंगा, तूर, ज्वारी या तीन शेतमालाच्या अनुक्रमे ९३,७३३ क्विंटल, ३०,८९४ क्विंटल, ५४,०३८ क्विंटल, शेतमालाचे प्रमाणीकरण झाले. शेंगा, तूर व ज्वारी या तीन शेतमालाच्या एकंदर आवकामध्ये त्याच शेतमालाच्या प्रमाणीत शेतमालाची टक्केवारी अनुक्रमे ४४.३४%, ३९.१३% व ३०.१७% अशी होती. बाजार आवारातील नियमित केलेल्या शेतमालाच्या एकंदर आवकांच्या २८.३९% शेतमालाचे प्रमाणीकरण केलेले होते.

इ.स. १९७३-७४ मध्ये एकंदर १,१४,४०६ क्विंटल (५८.९३%) शेतमालाचे प्रमाणीकरण झालेले ■ होते. त्यामध्ये शेंगा, तूर, मूग, उडीद, ज्वारी आणि हळद यांचे अनुक्रमे १५,२३६ क्विंटल, ४२,६३५ क्विंटल, ११,१७२ क्विंटल, ४,३०० क्विंटल, ३७,७०६ क्विंटल आणि ३,३५७ क्विंटल शेतमालाची प्रतवारी केलेली होती. त्यात शेतमालाच्या एकंदर आवकामध्ये प्रतवारीचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ८५.९७%, ८४.६४%, ७९.७७%, ८६.७७%, ७८.८४% व १२०.४९% असे होते.

१९८५-८६ मध्ये नियमित शेतमालाच्या एकूण आवकाच्या ५३.३७टक्के

## सारणी क्रमांक ६·५

### शासनाकडून ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार बार्शी बाजारातील शेतमालाची प्रतवारी दर्शविणारा तक्ता

| बाजार वर्ष | शेंगा | तूर | मुग | उडीद | हळद | ज्वारी | प्रमाणीत केलेला एकूण शेतमाल (क्विंटलमध्ये) २,३,४,५,६,व ७ ची बेरीज | नियमित केलेल्या शेतमालाची(१,८) एकूण आवक (क्विंटलमध्ये) | प्रमाणीकरण प्रमाण (स्तंभ ८ ची स्तंभ ९ शी टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १९६२-६३ | ९३,७३३ (४४·३४) | ३०,८९४ (३९·१३) | --- | --- | --- | ५४,०३८ (३०·१७) | १,७८,६६५ | ६,२९,२१६ | २८·३९ |
| १९६३-६४ | ६,३७,५५२ (३२·३०) | ६८,५७४ (६५·६०) | ५६,९३० (७५·१७) | --- | --- | २८,६६४ (१४·९२) | २,१८,९२० | ११,६०,०८५ | १८·७८ |
| १९६४-६५ | ६३,९७३ (४८·७०) | २१,३६३ (४५·६०) | २६,८७७ (६६·२२) | ७,०३६ (४०·८२) | --- --- | ११,६०४ ( ८·८३) | १,३०,८५३ | २,९५,६४७ | ४४·२५ |
| १९६५-६६ | ४०,४६० (४२·४२) | १६,१४७ (५·१२ ) | ४२,५८१ (११२·०७) | १६,२७० (७०·२६) | --- | १०,३६१ (१०·८६) | १,२५,८१९ | ५,८८,१४४ | २१·३९ |
| १९६६-६७ | ३४,०२२ (२६·६१) | --- | ६५,७६३ (९९·८८) | २९,११४ (८१·११) | --- | ७९,४३२ (६२·१३) | २,०८,३३१ | ४,५२,०५५ | ४६·०८ |
| १९६७-६८ | १९,१७४ (२१·७७) | ४२,०७२ (७३·१०) | ४४,०८८ (८८·९१) | १४,०६९ (७४·०८) | --- | एकाधिकार खरेदी | १,१९,४०३ | ३,४८,२४५ | ३४·२८ |
| १९६८-६९ | ६७,५५४ (३८·७७) | ७६,७१९ (१०२·५८) | ४२,२७९ (८२·८५) | १७,६१५ (७३·२४) | --- | --- | २,०४,१६७ | ३,३९,७६३ | ६०·०९ |
| १९६९-७० | ८६,३९२ (८५·०३) | ३३,४०३ (६९·४१) | २७,७६४ (४५·२९) | १३,००५ (५१·८४) | --- | --- | १,६०,६३४ | ३,५१,४३६ | ४६·७० |
| १९७०-७१ | ९१,२६८ (८२·७६) | ४३,००५ (६४·०६) | १६,५९६ (६८·७५) | ८,००५ (४३·७९) | --- --- | --- --- | १,५८,८७४ | ३,४९,८६० | ४५·४१ |
| १९७१-७२ | २९,७०० (३७·८६) | ४,७२२ (५०·२५) | ३,८२६ (५३·०३) | ५७३ (८७·४८) | ७,१२० (४९·८०) | --- | ४५,९४८ | ४,११,७०८ | ११·२० |
| १९७३-७४ | १५,२३६ (८५·९७) | ४२,६३५ (८४·६४) | ११,१७२ (७९·७७) | ४,३०० (८६·६७) | ३,३५० (१३०·४९) | ३७,७०६ (७८·८४) | १,१४,४०६ | १,९४,११३ | ५८·९३ |

.... पुढे चालू ...

सारणी क्रमांक ६·५ पुढे चालू .....

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७४-७५ | १४,७२१ (८३·२८) | ४४,८५१ (९१·३५) | १०,८०२ (९७·९८) | ३,६१८ (१४३·१७) | ४,८४४ (१०३·४३) | १०,१५० (७२·८७) | १,७८,९८६ | ३,२२,५०१ | ५५·४९ |
| १९७५-७६ | उ·ना· | ६१,२७१ (८९·४९) | १८,८२३ (९८·०५) | ९,९२३ (८७·९६) | १०,३८८ (११२·२१) | ६८,८९९ (८६·१७) | १,६१,३०४ | ३,१९,१३३ | ५०·५४ |
| १९७६-७७ | ३६,०५६ (७३·९६) | ९,८६६ (१७·८८) | २९,५६७ (९४·५५) | ७,६९१ (७९·५५) | १,०८८ (०·१७) | ९६,९०० (८४·७८) | १,४९,१६८ | ८,४८,७२९ | २१·११ |
| १९७७-७८ | ३२,२८८ (८९·५६) | ५२,४५१ (९०·६८) | १२,२३९ (९०·४६) | ४,९१५ (५·३२) | ६,२६६ (१२८·९३) | १,५९,१७० (७६·६४) | २,६७,३२९ | ४,१९,७८० | ६३·६८ |
| १९७८-७९ | ४४,०१४ (८९·५६) | १,१२,८३९ (९८·१२) | ६,६४१ (८१·३६) | २,१८२ (८०·४५) | ४,६७५ (१२२·३१) | १,३३,६०५ (७४·१६) | ३,०३,९५६ | ५,०५,३८३ | ६०·१४ |
| १९७९-८० | ३१,०७७ (६९·८०) | ८९,१३० (९१·५२) | ७,६४८ (८७·२८) | ८,०६१ (९१·०३) | ९,९९८ (११३·१५) | १,९६,७८८ (७८·६०) | ३,४२,७०२ | ५,४६,०७५ | ६१·६२ |
| १९८०-८१ | ५०,११५ (८३·७०) | ९०,६३४ (९६·३०) | ६,२२३ (९८·९०) | १,८१५ (८१·१७) | १,७५,०४६ (१४९८·६८) | १४,१५१ (७·१७) | ३,३८,०४४ | ५,२४,७६८ | ६४·४१ |
| १९८२-८३ | १४,६४१ (५०·९५) | ५७,५५१ (९४·६१) | १४,५५२ (१४८·९७) | १,७७५ (९२·७८) | ९७,४८८ (२४७१·१७) | ५,८०७ (५·१३) | १,९१,८१४ | ३,१६,६२७ | ६०·५८ |
| १९८३-८४ | ३१,२२६ (११३·७३) | ५३,१६३ (४११·९९) | १७,३८२ (१२८·८३) | ३,६९४ (२२८·४४) | १,०३,१४७ (१६५६·१८) | ५,८६३ (७·१३) | २,१४,४८५ | २,५८,८६५ | ८२·८५ |
| १९८५-८६ | १४,४०५ (९२·८५) | ६५,२९२ (४५·६८) | ३,६२० (१०२·१४) | ४,१०८ (९६·३१) | १,६५,१८६ (३३१८·११) | १,३०,२७६ (७१·७८) | २,९५,७७१ | ४,२२,९७९ | ५३·३७ |
| १९८६-८७ | ८५,८९७ (८३८·९१) | ८०,६५० (३४१·९८) | ५,३३१ (७५·६५) | ११,५४८ (२३७·५६) | १२,४३२ (१५८·६४) | ८,४३८ (१२·२७) | २,०४,२९३ | ३,२५,००१ | ६२·८३ |

आधार : वार्षिक अहवाल कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी· १९५९-६० ते १९८६-८७·

टीप : १) १९६७-६८ ते १९७१-७२ पर्यंत सरकार मार्फत एकाधिकार खरेदी केंद्रामार्फत ज्वारीची खरेदी केली जात होती·

२) कंसातील आकडे त्याच शेतमालाच्या एकूण आवकांपैकी प्रमाणीकरणाची टक्केवारी दर्शवितात·

(२,२५,७७१ क्विंटल) शेतमालाचे प्रमाणीकरण झालेले होते. त्यावर्षी शेंगा, तूर, मूग, उडीद, हळद व ज्वारी या सहा शेतमालाचे अनुक्रमे १४,४०५ क्विंटल, ६५,२९२ क्विंटल, १,६२० क्विंटल, ४,१०८ क्विंटल, १,६५,१८६ क्विंटल व १,३०,२७६ क्विंटल, इतक्या शेतमालाचे प्रमाणीकरण झाले. प्रमाणीत केलेल्या शेतमालाची त्याच शेतमालाच्या आवकाशी टक्केवारी अनुक्रमे ९२·८५%, ४५·६८%, १०२·४४%, ९६·३१%, ३२१८·११% व ७१·१८% अशी होती.

शेंगा, तूर, मूग, उडीद, हळद व ज्वारी या सहा शेतमालाचे प्रमाणीकरण करण्याची व्यवस्था बार्शी बाजार आवारात आहे. सर्व शेतमालाची प्रतवारी होत नाही.

तथापि काही प्रमाणीत शेतमालाची टक्केवारी १००% पेक्षा जास्त आहे. त्याची कारणे अशी असून शकतील ( निश्चित सांगणे कठीण आहे ) की, प्रमाणीकरण झालेल्या शेतमालाची आवक न दाखविल्यामुळे आवकापेक्षा प्रमाणीकरणाचे प्रमाण ह जास्त आहे. प्रमाणीकरण केल्यानंतर तो माल त्याच अडत्याने उघडरीत्या लिलाव पध्दतीने खरेदी केला असेल. कारण [illegible] अडते व कमिशन एजंट माल खरेदी केल्याचे फक्त दाखवून देतात. हळदीच्या व्यवहारात असे जास्त झाल्याचे दिसते. याचे दुसरे एक कारण असे असू शकेल की, प्रमाणीकरण करुन घेउन तो माल दुस-या बाजार आवारात विकला गेला असेल. उदा·सांगली मार्केट किंवा स्थानिक व्यापा-याला किंवा कारखानदाराला विकला गेला असेल, किंवा शेतकरी स्वत: फक्त प्रमाणीकरण करुन घेउन घरी शेतमाल आणत असेल तर प्रमाणीकरणासाठीची आवक अधिक असू शकते.

६·६ <u>प्रमाणीकरण केलेला शेतमाल आणि त्याचे एकूण आवकाशी असलेली टक्केवारी</u> :

शेतक-याच्या मालाला योग्य भाव मिळावा; ग्राहकास त्यांच्या आवडीनुसार त्याचा माल खरेदी करता यावा, व शेतमालाची होणारी भेसळ

थांबवून तिचा दर्जा टिकवावा, या हेतूने १९६२ साली शेंगा, ज्वारी, तुर , मूग, उडीद, आणि हळद या सहा शेतमालाचे प्रमाणिकरण करण्याची व्यवस्था बार्शी बाजारात करण्यात आली. सन १९६२-६३ ते १९८६-८७ अखेर प्रत्येक वर्षाची आवक प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाची टक्केवारी सारणी क्रमांक ६.६ मध्ये दर्शविली आहे.

## सारणी क्रमांक ६.६

### प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाचे एकूण आवकाशी असलेले प्रमाण

| वर्ष | एकूण आवक (क्विंटलमध्ये ३८ शेतमाल) | प्रमाणीकरण केलेला शेतमाल(क्विंटलमध्ये ६ शेतमाल) | प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाचे एकूण(आवकेशी असलेली टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १९६२-६३ | ६,२९,२१६ | १,७८,६६५ | २८.३९ |
| १९६३-६४ | ११,६०,०८५ | २,१७,९२० | १८.७८ |
| १९६४-६५ | २,८५,६४७ | १,३०,८५३ | ४४.२५ |
| १९६५-६६ | ५,८८,१४४ | १,२५,८१९ | २१.३९ |
| १९६६-६७ | ४,५२,०५५ | २,०८,३३१ | ४६.०८ |
| १९६७-६८ | ३,४८,२४५ | १,१९,४०३ | ३४.२८ |
| १९६८-६९ | ३,३९,७६३ | २,०४,१५७ | ६०.०९ |
| १९६९-७० | ३,५१,४३६ | १,६०,६३४ | ४६.७० |
| १९७०-७१ | ३,४९,८६० | १,५८,८७४ | ४५.४१ |
| १९७१-७२ | ४,१३,७०८ | ४५,९४८ | ११.१० |
| १९७३-७४ | १,९४,११३ | १,१४,४०६ | ५८.९३ |
| १९७४-७५ | ३,२२,५०१ | १,७८,९८६ | ५५.४९ |
| १९७५-७६ | ३,१९,११३ | १,६१,३०४ | ५०.५४ |
| १९७६-७७ | ८,४८,७२९ | १,७९,१६८ | २१.११ |

तक्ता पुढे चालू ...

सारणी क्रमांक ६·६          पुढे चालू ···

| वर्ष | एकूण आवक (क्विंटलमध्ये ३८ शेतमाल) | प्रमाणीकरण केलेला शेतमाल(क्विंटलमध्ये ३ शेतमाल) | प्रमाणीकरण केलेल्या शेतमालाचे एकूण(आवकेशी असलेली टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १९७७-७८ | ४,१९,७८० | २,६७,३२९ | ६३·६८ |
| १९७८-७९ | ५,०५,३८३ | ३,०३,९५६ | ६०·१४ |
| १९७९-८० | ५,५६,००५ | ३,४२,७०२ | ६१·६२ |
| १९८०-८१ | ५,२४,७६८ | ३,३८,०४४ | ६४·४१ |
| १९८२-८३ | ३,१६,६२७ | १,९१,८१४ | ६०·१४ |
| १९८३-८४ | २,५८,८६५ | २,१४,४८५ | ८२·८५ |
| १९८५-८६ | ४,२२,९७९ | २,२५,७७१ | ५३·३७ |
| १९८६-८७ | २,७४,७६३ | १,३९,६८६ | ५०·८३ |

आधार : संकलीत, वार्षिक अहवाल, कृषी उत्पन्न बाजार समिती,बार्शी सन १९६२-६३ ते १९८६-८७·

१९६२-६३ साली शेंगा, तूर, ज्वारी या तीन शेतमालाची मिळून एकूण १,७८,६६५ क्विंटल शेतमालाची प्रतवारी केली होती, म्हणजे २८·३९% शेतमालाचे प्रमाणीकरण झाले होते· १९६३-६४ मध्ये हे टक्केवारी १८·७२ पर्यंत कमी झाली·

१९६२-६३ ते १९८६-८७ या काळात सर्वात जास्त प्रमाणीकरण, १९८३-८४ साली ८२·२५% इतके झालेले होते· त्यानंतर १९८०-८१ मध्ये ६४·४१%, १९७७-७८ मध्ये ६३·६८%, आणि १९७५-७६ मध्ये ५०·५४% शेतमालाची प्रतवारी झाली·

प्रमाणीकरणाची सर्वात कमी टक्केवारी सन १९६३-६४, १९७१-७२ व १९७६-७७ साली अनुक्रमे १८·७८% व ११·१०%, २१·११% इतक्या प्रमाणात झाली·

शेंगा, तूर, मूग, उडीद ही पीके खरीप हंगामातील आहेत· खरीप हंगामात जर पाऊस चांगला झाला तरच या पीकांची आवक वाढते, आणि पर्यायाने प्रमाणीकरणाची टक्केवारीही वाढते· उदा· १९७१-७२ साली खरीप हंगामात पाऊस कमी झाला म्हणून आवक कमी झाली, परिणामी टक्केवारी फक्त ११·१०% इतकीच होती·

वरील विश्लेषणावरून बार्शी बाजार आवारातील नियमित २६ (तेलबियावगळून) शेतमालांची उलाढाल कोणत्या स्थितीची होती हे स्पष्ट होते· भारतीय शेती ही पाऊसावरील जुगार आहे· याचा प्रत्यक्ष प्रत्यय बार्शी बाजार आवारातील शेतमालाच्या आवकावरून लक्षात येते· कालानुक्रमे बार्शी बाजार आवारातील एकंदर आवकही वाढत असल्याचेही दिसते· शेती उत्पादनातील सामर्थ्याचा वापर चढत्या गतीने धनात्मक अशा स्वरूपात होत आहे हे स्पष्ट होते असे असले तरी शेतमालाची विक्री म्हणजे किंमतीशी जुगार आहे·

=0=0=0=0=0=